# प्रतिज्ञापत्र

मी सुहास गोविंदराव पुजारी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, ''मारुती चितमपल्लींचे निसर्ग साहित्य :एक अभ्यास'' ('पक्षी जाय दिगंतरा' व 'जंगलाचं देणं' या संग्रहांच्या आधारे) या विषयावरील लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम.फिल. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी सादर करीत आहे.

हा लघु-प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही.

सुहास पुजारी

अभ्यासक

सुहास गोविंदराव पुजारी

सोलापूर

दि. २९ जून १९९८

# प्रमाणपत्र

सुहास गोविंदराव पुजारी यांनी ''मारुती चितमपल्लींचं निसर्ग साहित्य: एक अभ्यास'' ('पक्षी जाय दिगंतरा' व 'जंगलाचं देणं' या संग्रहांच्या आधारे) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक रीतीने लघु-प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनांतील विश्लेषण आणि विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने अन्यत्र उपयोजिला नाही.

प्रस्तुत विषय ''ललित गद्य'' या वाङ्मय प्रकारातील आहे.

हा लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम.फिल.(मराठी) पदवी परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

सोलापूर
दि. २१ जून १९९८

प्राचार्य
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर
I/C. PRINCIPAL, SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR.

मार्गदर्शक
(डॉ. राजशेखर गं. हिरेमठ)
मराठी विभाग प्रमुख
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर.

Prof. Dr. R. G. Hiremath
Reader in Marathi
Sangameshwar College,
SOLAPUR-413001

# प्रास्ताविक

पुण्यात शास्त्र शाखेतील पदवी परीक्षेसाठीचे शिक्षण मी पूर्ण केले. त्यावेळी द्वितीय वर्षासाठी मारुती चितमपल्ली यांचा 'तणमोराच्या शोधात' हा ललितलेख अभ्यासक्रमात होता. तेव्हा चितमपल्लींच्या साहित्याची आणि माझी पहिली ओळख झाली. तणमोरासाठीची ती शोधयात्रा, त्यातील कविमनाचा तो पारधी मनःपटलावर आपला ठसा उमटवून गेला. चितमपल्लींच्या ललितरम्य काव्यात्म शैलीने मोहिनी घातल्याने त्यांचे ललितलेख संग्रह मिळवून त्यांचे वाचन मी आवडीने करू लागलो. साहित्य-कला आणि संशोधन यांचा सुंदर मेळ मला त्या साहित्यात जाणवू लागला.

पुढे माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी सुचविल्याप्रमाणे व मुळात निसर्गविषयक साहित्याची आवड असल्याने 'मारुती चितमपल्लींचे निसर्ग साहित्य : एक अभ्यास' हा विषय एम.फिल पदवी परीक्षेच्या लघु-प्रबंधासाठी मी निवडला. हा विषय निवडण्यामागची आणखी एक महत्त्वाची भूमिका म्हणजे, कोणत्यातरी अलक्षित विषयावर लेखन करावे असा विचार मनात होता. त्याप्रमाणे निसर्ग साहित्याचा जेव्हा मी विचार करू लागलो तेव्हा असे जाणवले की मराठीतील निसर्ग कवितेवर प्रबंध लेखन झाले आहे. पण निसर्ग साहित्य एक स्वतंत्र वाङ्मय प्रवाह ठरू शकतो असा दृष्टिकोन ठेवून कोणी अभ्यास केले नाही. मराठी साहित्यात निसर्ग साहित्याची पहाट झाली आहे. याचे सूचनही चितमपल्लींच्या निसर्गलेखनाच्या अभ्यासातून आपणाला करता येईल असा विश्वास वाटला म्हणून प्रस्तुत विषय निवडला आहे.

/चितमपल्लींनी आपल्या साहित्यात निसर्गाला एक स्वतंत्र, स्वयंभू असे व्यक्तित्व दिले आहे. पशु-पक्षी, वृक्ष-वल्ली, यांच्यासह जलाशय, अरण्ये व अन्य निसर्गघटक त्यांच्या लेखनांत सजीव झालेले आढळतात.त्यांच्या रंगरूपासह वृत्तिविशेषांचे दर्शनही चितपल्लींनी कलात्मक पद्धतीने घडवले आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात प्रकटणारा निसर्ग हा पार्श्वभूमी म्हणून येत नाही तर स्वतंत्र व्यक्तित्व घेऊन येतो व तोच त्यांच्या साहित्यातील नायक व केंद्रबिंदू ठरतो. हे त्यांच्या साहित्याचे निराळेपण एका स्वतंत्र वाङ्मयप्रवाहाची नोंद करणारे आहे. शिवाय अलक्षित अरण्यानुभवाची कशी कलात्मक अभिव्यक्ती त्यांनी साधली आहे. त्याचे दर्शनही घडविण्याचा प्रस्तुत लघु-प्रबंधातून मी प्रयत्न केला आहे. या प्रयत्नातून अद्भुत अरण्ययात्रेचा आनंददायी अनुभव मला घेता आला. /

हा माझा प्रयत्न असला तरी, प्रेरणा व मार्गदर्शन माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. राजशेखर हिरेमठ यांची आहे. त्यांच्या मार्गदर्शनानेच एका प्रतिभाशाली निसर्गलेखकाचा मला शोध घेता आला. त्यामुळे त्यांच्या प्रेरणेबद्दल व मार्गदर्शनाबद्दल मला आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.

माझी साहित्यविषयक जाण वाढण्यास माझे मार्गदर्शक डॉ. राजशेखर हिरेमठ यांच्याखेरीज

माझे आदरणीय सन्मित्र डॉ. शे. दे. पसारकर यांचा सहवास व त्यांचे मार्गदर्शन मला मोलाचे ठरले आहे त्याबद्दल मला आदरपूर्वक ऋण व्यक्त केले पाहिजे.

प्रस्तुत लघु-प्रबंध लेखनासाठी मराठीतील नामांकित समीक्षकांच्या समीक्षा ग्रंथांचा आधारभूत ग्रंथ म्हणून मला उपयोग झाला. त्याबद्दल रा. चिं. ढेरे, प्र. न. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, भ. श्री. पंडित, वा. भा. पाठक, गंगाधर गाडगीळ, आनंद यादव, रा. शं. वाळिंबे, चंद्रकांत वर्तक, अविनाश सहस्रबुद्धे, म. द. हातकणंगलेकर या सर्वांचे ऋण मान्य करणे मला योग्य वाटते.

या लघु-प्रबंध लेखनाच्या निमित्ताने मारुती चितमपल्ली यांची मुलाखत मी घेतली. तीन-साडेतीन तास त्यांनी आपल्या साहित्याविषयी मोकळेपणाने चर्चा केली. याखेरीज मुलाखत वाचून काही सूचना केल्या, डॉ. सलीम अली यांचे नाव 'सालीम' असे आहे ही त्यांनीच सूचविलेली दुरुस्ती, त्याप्रमाणे प्रस्तुत प्रबंधात डॉ. सालीम अली असेच लेखन ठेवले आहे. अशा सहकार्याबद्दल त्यांचेही ऋण मी येथे नोंदविणे योग्य समजतो.

लघु-प्रबंध लेखनासाठी मला अनेक ग्रंथांचा धांडोळा घ्यावा लागला. संगमेश्वर महाविद्यालयाच्या समृद्ध अशा ग्रंथालयाचे त्यासाठी फार मोठे योगदान लाभले. त्याबद्दल ग्रंथपाल ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे आभार ! संगमेश्वर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य शरद जनई यांनी वेळोवेळी प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचेही ऋण मान्य करतो.

मराठी भाषेविषयी अभिरुची निर्माण करण्यात आणि माझ्या व्यक्तित्वाची जडणघडण करण्यात माझ्या आई-वडिलांचा वाटा फार मोठा आहे. माझ्यासारख्या पूर्णतः बहिःस्थ विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याचे तेच खरे गुरू आहेत. त्यांच्या मायेचा, कौतुकाचा व आशीर्वादाचा हात पाठीवरून फिरत राहिल्यानेच मी उच्च-शिक्षणापर्यंतचा प्रवास करू शकलो आहे. त्यांच्याविषयी भावना व्यक्त करण्यास माझे शब्द खरोखरच असमर्थ आहेत. माझा भाऊ व माझ्या बहिणी यांच्याविषयीही मला अशीच भावना व्यक्त करावी वाटते. सौ. कांचन व माझा भाचा चि. सुशील भगवान यांनी मुद्रित शोधनाच्या कार्यात मला बहुमोल सहाय्य केले आहे, याची नोंद करणे मला योग्य वाटते.

संगणकीय अक्षरजुळणीचे काम एस. के. कॉम्प्युटर्सच्या श्री. उन्मेष शहाणे यांनी कमीत कमी वेळेत पण आकर्षक स्वरूपात केले, त्याबद्दल त्यांचेही आभार! या लघु-प्रबंधाच्या निमित्ताने डॉ. नरेंद्र कुंटे, डॉ. विजय अभ्यंकर, डॉ. निनाद शहा यांचेही सहकार्य लाभले. अनेक नवे मित्र मिळाले. अनेकांनी अनेकपरींनी मदत केली. त्यांची नोंद माझ्या मनात आहे. त्यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

**- सुहास गोविंदराव पुजारी**